# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन


ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन:०२०-२९५१६२६४ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल:amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २४/०३/२०२६

## जिल्हा :पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३४.० ते ३६.२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १६.७ ते १९.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७० ते ९० टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १७ ते २९ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.४ ते ५.१ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३६ ते ३८ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १७ ते १९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४५ ते ६८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३० ते ३२ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०६ ते ०९ कि .मी. दरम्यान राहील. आकाश निरभ्र ते अंशतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्तेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (१८/०३/२०२६ ते २४/०३/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२४/०३/२०२६ ते २८/०३/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **18** | **19** | **20** | **21** | **22** | **23** | **24** | दिनांक | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 1.0 | 3.0 | 4.0 | 0.0 | 0.0 |
| 35.5 | 35.2 | 34.0 | 35.0 | 34.0 | 35.7 | 36.2 | कमाल तापमान(अं.से.) | 37 | 38 | 38 | 37 | 36 |
| 18.7 | 19.5 | 16.7 | 17.5 | 17.2 | 17.8 | 19.3 | किमान तापमान(अं.से.) | 17 | 18 | 19 | 18 | 17 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 1 | 2 | 2 | 1 | 0 |
| 79 | 75 | 85 | 90 | 77 | 73 | 70 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 47 | 52 | 45 | 47 | 68 |
| 22 | 28 | 17 | 29 | 18 | 19 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 31 | 31 | 30 | 30 | 32 |
| 4.3 | 3.1 | 5.1 | 3.9 | 2.5 | 2.4 | 3.2 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 6 | 7 | 8 | 9 | 9 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 325 | 313 | 340 | 348 | 294 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २४, २५ व २६ मार्च, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून दिनांक २७ ते २८ मार्च, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २९ मार्च, २०२६ ते ०४ एप्रिल, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • अवेळी पाऊसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकांची, फळे व भाजीपाल्याची काढणी करुन घ्यावी.<br>• काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. मळणी करणे शक्य नसल्यास, काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत.<br>• अवेळी पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>• कोरडे हवामान लक्षात घेता उभी पिके ,भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, जमिनीची खोली, जमिनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे व अच्छादनाचा वापर करावा.<br>• नवीन लागवड केलेल्या फळबागांतील रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे.<br>• हरभरा व ज्वारी पिकाची काढणी पूर्ण झाली असेल तेथे गरज असल्यास नागरणी किंवा कुळवणी करून घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानाचा पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **ऊस** | पीक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोड किडी च्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. सुरु ऊसाला एका आड एक सरीतून पाणी दयावे व पीक तणविरहीत ठेवावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी ऊसाचे पाचट सरीमध्ये आच्छादन म्हणून वापरावे. ज्या ठिका णी पट्टा पध्दतीने लागण केलेली आहे अशा ठिकाणी ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब करावा. |
| **गहू** | पक्वता ते काढणी अवस्था | पीक तयार होताच वेळेवर पिकाची कापणी करावी. कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी , यंत्राच्या सहाय्याने करावी किंवा गव्हाची कापणी व मळणी कंबाईन हार्वेस्टर मशीनने करावी. |
| **रब्बी ज्वारी** | पक्वता ते काढणी अवस्था | पक्वता दिसताच ज्वारीची काढणी करावी. ज्वारी काढणीनंतर ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवून मळणी करावी. धान्य उफणनी करुन तयार झाल्यानंतर त्याला पुन्हा साठवणुकीपूर्वी उन्हात वाळवावे. सर्वसाधारणपणे ५० किलोची पोती भरुन ठेवल्यास पुढे बाजारपेठेत विक्री करणे सोपे जाते. पिकाची काढणी पूर्ण झाली असेल तेथे गरज असल्यास नागरणी किंवा कुळवणी करून घ्यावी. |
| **करडई** | पक्वता ते काढणी अवस्था | कोरडवाहू करडई ची काढणी साधारणपणे १३० ते १३५ दिवसात पीक पक्व होताच करावी. पाने व बोंडे पिवळी पडतात. पिकाची काढणी सकाळी करावी. हवेत आर्द्रता जास्त असल्याने दाणे गळत नाही व हाताला काटे टोचत नाहीत. कापणीनंतर झाडांची कडपे रचून पेठे करावीत. ते पूर्ण वाळल्यानंतर काठीने बडवून काढावे व नंतर उफणणी करून बी स्वच्छ करावे. काढणी , गव्हाच्या एकत्रित काढणी व मळणी यंत्राने करावी. या यंत्राने काढणी अत्यंत कमी खर्चात आणि कमी वेळात करता येते व त्यापासून स्वच्छ माल मिळतो. करडई काढणीसाठी एकत्रित काढणी व मळणी यंत्राचा प्राधान्याने वापर करावा. |
| **हरभरा** | पक्वता ते काढणी अवस्था | हरभरा पीक ११० ते १२० दिवसांमध्ये तयार होते. पीक ओलसर असताना काढणी करु नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी. यानंतर धान्यास ५-६ दिवस कडक ऊन द्यावे. हरभरा कोठीमध्ये साठवून ठेवावा. त्यामध्ये कडुलिंबाचा पाला (५ टक्के) घालावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. पिकाची काढणी पूर्ण झाली असेल तेथे गरज असल्यास नागरणी किंवा कुळवणी करून घ्यावी. |
| **उन्हाळी भुईमूग** | पीक वाढीची अवस्था | भुईमुग पिक पेरणीनंतर ४० दिवंसापर्यंत तण विरहीत ठेवावे. उन्हाळी भुईमुगास जमिनीच्या मगदूरा प्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |
| **कांदा (रांगडा)** | पीक वाढीची अवस्था | फुलकिडीच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. १० मि.ली. किंवा टोलफेनपायरॅड १५ ई.सी.२ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन ११ ई.सी. ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून आलटुन पालटून फवारण्या कराव्यात. अधून मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. करपा / मानमोड्या/ मानेचा पीळ रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५% ई.सी.१० मि.ली. १० लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल २५.९ टक्के ई.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४१% १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन ११% + टेब्युकोनॅझोल १८.३% १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा किटाझिन ४८% इ.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यातून १० दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावेत. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा. कोरडे हवामान लक्षात घेता पिकास शिफारशी प्रमाणे पाणीपुरवठा करावा. बागेत केळी पाने व अवशेष, जुना गव्हाचा भुसा, ऊसाचे पाचट, सोयाबीन भुसा यांचा वापर करुन सेंद्रिय अच्छादन करावे.<br>पनामा रोगाचे प्रभावीपणे व्यवस्थान करण्यासाठी प्रारंभिक उपाय योजना :-<br>कोणताही रोग फक्त बुरशीनाशके वापरून रोग नियंत्रणाच्या उपायांना मर्यादा येतात. म्हणूनच |

| | | |
|---|---|---|
| | | प्रतिबंधात्मक उपयांवर भर देणे अत्यंत महत्वाचे आहे.<br>केळी कंद निवड व प्रक्रिया :-<br>केळी लागवडीसाठी कंद अथवा मुनवे निरोगी आणि जातीवंत बागेतून निवडावे. लागवडीपुर्वी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम अधिक १५० ग्रॅम ॲसिफेट व १५ ग्रॅम स्ट्रेप्टोसायक्लीन घेवून या द्रावणात कंद ३० ते ४० मिनीटे बुडवावीत व नंतर लागवड करावी किंया मुनवे / रोपे जैविक बुरशी (ट्रायकोडर्मा हर्नियानम / ट्रायकोडर्मा एस्पेरेलम) अधिक जैविक जीवाणू (स्यूडोमोनास फ्लोरोसेंरा) च्या द्रावणात बडवून लागवड करावी.<br>ऊतिसंवर्धित रोपांची निवड :-<br>अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर ऊतिसंवर्धित रोपे लावून केळीची लागवड केली जाते. मात्र यात रोपांची निवड अंत्यत महत्वाची आहे. एक सारख्या वाढीचे ३० ते ४५ रोमी उंचीचे, किमान ५ ते ६ पाने असलेली रोग विरहित आणि उत्तम कणखरता असलेली रोपे असावीत.<br>खालील एकात्मिक रोग व्यवस्थापन पद्धतीने हा रोग नियंत्रित केला जाऊ शकतो :-<br>* चांगल्या कृषि पद्धतींचा अवलंब<br>* शेत तणमुक्त ठेवावे.<br>* दुरावासाचे ( क्वारनटाईन) चे नियम काटेकोरपणे पाळावे , नाविन्यता म्हणून किंवा कॅरहेण्डीश व इतर जनुक समुदायातील (जिनोमिक गट) वाण परराज्यातून आणून त्यांची लागवड करू नये. महत्वाचे म्हणजे एक पिक पध्दतीचा अवलंब न करता केळी फळपिकावर केळी पीक घेणे टाळून पिकांची फेरपालट करावी.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतातून बाहेर पडण्यापूर्वी तसेच शेतात जाण्यापूर्वी ट्रॅक्टरचे टायर , नांगर आणि इतर उपकरणे निर्जंतुक करणे आवश्यक आहे.<br>* 'क्लीन इन अँड गो आऊट' पॉलिसीचे पालन करा (शेतात प्रवेश करताना प्लास्टिक (पॉलिथिनचे) शूज किंवा फूट कव्हर घाला आणि शेतातून बाहेर पडताना ते काढून टाका आणि पुन्हा वापरण्यासाठी ठेवा) , शेतात प्रवेश करताना बांधावर दोन ड्रम, एक पाणी ठेवण्यासाठी आणि दुसरा निर्जंतुकीकरण द्रावण ठेवण्यासाठी (१% पॉली डायमिथाइल अमोनियम क्लोराईड १ लिटर पाण्यात १० ग्रॅम या प्रमाणात) वापरलेली उपकरणे , हात आणि पाय प्रथम पाण्याने आणि नंतर जंतुनाशक द्रावणाने धुवावे.<br>* खतांचे योग्य व्यवस्थापन करावे, खतांच्या शिफारस केलेली मात्रा (नायट्रोजन कमी प्रमाणात आणि पोटॅशियम जास्त प्रमाणात) वापरावी.<br>* सेंद्रिय खते पुरेशा प्रमाणात वापरून मातीचे आरोग्य सुधारावे. यामध्ये गांडूळ खत , कडुनिंबाचा पेंड, चांगले कुजलेले शेणखत वापरावे.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतात 'सावधान' चे बोर्ड लावून, झाडाला रंगीत रिबन बांधावी.<br>* प्रादुर्भावग्रस्त शेतातील पाणी इतर शेतात जाणार नाही याची काळजी घ्यावी. |
| **द्राक्ष** | पीक वाढीची अवस्था | द्राक्ष मण्यांचा आकार कमी होऊ नये यासाठी बोदावर आच्छादन करावे. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी मायक्लोब्युटॅनील १०% डब्ल्यु पी ४ ग्रॅ./१० लि.पाणी किंवा डायफेनकोनॅझोल २५ ई.सी. ५ मिली./१० लिटर पाणी किंवा पेनकोनॅझॉल १०% इ.सी. ५ मिली/१० पाणी किंवा सल्फर ८० डब्ल्यु पी २५ ग्रॅ./१० लिटर पाणी किंवा सल्फर ८० डब्ल्यु डि.जी. १५ ते २० ग्रॅम / १० लिटर पाणी किंवा डायमिनोमार्क ५०% डब्ल्यू पी. १ ग्रॅम प्रति लिटर किंवा फोसेटाइल ए.एल. २ ग्रॅम प्रति लिटर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट ५ ग्रॅ./१० लिटर किंवा हेक्झाकोनेझॉल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी करताना मण्यांवर डाग येणार नाही व काढणी पश्चात औषधांचे अंश राहाणार नाहीत अशा औषधांची निवड करावी. निर्यातक्षम द्राक्षासाठी ॲम्पेलोमायसिस क्विसक्विलीस बुरशीचा ५ ग्रम किंवा ५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **आंबा** | पीक वाढीची अवस्था | कोरडे हवामान लक्षात घेता फळबागेला स्थानिक परिस्थिती, जमिनीची खोली, जमिनीचा प्रकार व झाडाच्या गरजेनुसार पाणी द्यावे. आंब्यावरील तुडतुडे या किडीच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेझिन २५% एस.सी. २० मिली किंवा इमिडॅक्लोप्रीड १७.८ एस.एल. ३ मिली किंवा लॅम्डा सायहॅलोथ्रिन ५% इ.सी. १० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे. मोहरावरील करपा रोगाच्या नियंत्रणसाठी पहिली फवारणी डोळे फुटताच ॲझॉक्झीस्ट्रॉबीन २३% एस.सी. १० मिली/१० लि. पाण्यात मिसळून करावी. आंबा मोहरावरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी पीक फुलोऱ्यात असताना कार्बेन्डॅझीम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यू.पी. (२० ग्रॅम/१० ली पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या दहा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या घ्याव्यात किंवा कार्बेन्डॅझीम ५० डब्ल्यू.पी. १ ग्रम प्रति लिटर पाणी किंवा हेक्झाकोन्याझोल १ मिली प्रति लिटर पाणी किंवा ८० डी.डब्ल्यू.जी. सल्फर २ ग्रम प्रति लिटर पाण्यातून फवारावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | उन्हाळी हंगामात जनावराना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका या चारा पिकांची लागवड करावी. सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : २४.०३.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**